# प्रेसनोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : १०.०७.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १. श्री.पंकज रमेशराव निंघोट, वय ३० वर्षे, पद — ग्रामिण गृहनिर्माण अभियंता (RHE) पंचायत समिती धारणी, ता. धारणी जि.अमरावती रा. रा. धनई नगर, सुरेश धुर्वे यांचे घरी किरायाने, धारणी, ता. धारणी, जि. अमरावती जवहार नगर, टांक लेआउट ता.जि.अमरावती. मुळ पत्ता रा. शेंदोडा खुर्द, ता. तीवसा, जि. अमरावती (कंत्राटी) |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | १०/०७/२०२५ चे १५/४५ ते १६/०२ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | १५,०००/—रुपये |
| ५ | काम होण्यापुर्वी पहीला टप्पा म्हणुन मागितलेली लाच रक्कम | १०,०००/— रूपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | १०,०००/—रुपये |
| ७ | घटनास्थळ | पंचायत समिती धारणी, ता. धारणी, जि.अमरावती कार्यालय परिसर |

**थोडक्यात हकिकत** :— यातील तक्रारदार यांनी दिनांक ०९/०७/२०२५ रोजी तक्रार दिली की, तक्रारदार यांना त्यांचे रमाई आवास योजने अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरकुलाचे ३ ऱ्या टप्याचे बिलाचा चेक काढुन देण्याकरीता पंचायत समीती धारणी येथिल इलोकसेवक श्री. पंकज रमेशराव निंघोट, वय ३० वर्षे, पद— ग्रामिण गृहनिर्माण अभियंता (RHE) पंचायत समिती धारणी, ता.धारणी जि.अमरावती (कंत्राटी) रा. धनई नगर, सुरेश धुर्वे यांचे घरी किरायाने, धारणी, ता. धारणी, जि. अमरावती. मुळ पत्ता रा. शेंदोडा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती हे १५,०००/— रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबत दिलेल्या लेखी तक्रार दिली.

सदर तक्रारी वरून आज दि. १०.०७.२०२५ रोजी वरील नमूद इलोकसेवक यांनी पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना पंचा समक्ष त्यांचे घरकुल बांधनीचे ३ ऱ्या टप्याचे बिलाचा चेक काढुन देण्यापुर्वी १०,०००/— रुपये व चेक काढुन दिल्यानंतर ५,०००/— रुपये दयावे लागतील अशी लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्याण घरकुल बांधनीचे ३ ऱ्या टप्याचे बिलाचा चेक काढुन देण्याकरीता १०,०००/— रुपयाची लाच पंचासमक्ष स्विकारल्यावरून नमूद इलोकसेवक यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचेविरुध्द पो.स्टे.धारणी ता. धारणी. जि.अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. मारुती जगताप, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र, श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. सुजाता बन्सोड, पोनि.मेसरे, पो.नि ज्ञानोबा फड, पो. अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडु, आशिष जांभोळे, चालक पोउपनि सतीश कीटुकले, पोहवा शेंडे यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१—२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर— १०६४.

पोलीस उप अधिक्षक अॅन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

SUJATA G. BANSOD
Police Inspector
Anti Corruption Bureau